



मराठी साप्ताहिक

# निसर्ग चक्र

संपादक: शिवम राजेंद्र वखरे

■ कार्यकारी संपादिका
सौ. सिमा राजेंद्र वखरे

■ Postal Regd.No. THC/262/2023-2025
■ RNI.No. MAHMAR/2022/83338
■ E Mail : nisargchakra2001@gmail.com

■ वर्ष : ०२
■ अंक : ४३
■ पाने : ४
■ कल्याण, जि. ठाणे
■ मंगळवार, दि. ३० एप्रिल ते ०६ मे २०२४
■ मूल्य : रु ५.००/-
■ आर. एन. आय.नं. एमएएचएमएआर/२०२२/८३३३८

■ Vol : 02 ■ Issue : 43 ■ Marathi Weekly ■ Pages : 4 ■ Kalyan, Dist Thane ■ Tuesday, Date : 30 April To 06 May 2024 ■ Price 5.00 /-


# महायुतीच्या जागा कोणाच्या वाट्याला किती जागा?

## वाटपाचा आकडा पहिल्यांदाच समोर!

**लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या दोन टप्प्यांसाठी मतदान पार पडलं असून, आता महायुतीमधील घटक पक्षांच्या जागा वाटपाचा आकडा समोर आला आहे.**



मुंबई : लोकसभा निवडणुकीचं बिगूल वाजलं आहे. लोकसभा निवडणुकीसाठी पहिल्या दोन टप्प्यांचं मतदान देखील पार पडलं आहे. मात्र राज्यात महायुतीच्या जागा वाटपाचा तिढा अजूनही सुटला नसल्याचं पाहायला मिळत आहे. महा युतीच्या जागा वाटपाचा आकडा पहिल्यांदाच समोर आला आहे. राज्यातील ४८ लोकसभेच्या जागांपैकी ४२ जागांवर महायुतीकडून उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. मात्र अजूनही सहा जागांवर निर्णय होऊ शकलेला नाहीये.सहा जागांपैकी एक असलेल्या कल्याण डोंबिवलीमधून श्रीकांत शिंदे यांना उमेदवारी निश्चित झालेली आहे. मात्र तरी देखील अद्याप उमेदवारीची औपचारीक घोषणा बाकी आहे. महायुतीकडून लोक सभेच्या राज्यातील ४८ पैकी ४२ जागांवर उमेदवाराची घोषणा करण्यात आली आहे. समोर आलेल्या आकडेवारीनुसार यामध्ये भाजपला २७ शिवसेनेला १० तर राष्ट्रवादीच्या वाट्याला पाच जागा आल्या आहेत. कल्याण डोंबिवलीमधून श्रीकांत शिंदे यांना उमेदवारी निश्चित झालेली आहे. मात्र त्यांच्या नावाची औपचारिक घोषणा बाकी आहे. तर पाच जागांवरील तिढा अजूनही सुटलेला नाहीये. नाशिक, पालघर, ठाणे, मुंबई उत्तर पश्चीम, आणि मुंबई दक्षिण या जागांचा यामध्ये समावेश आहे.नाशिक लोकसभेवर राष्ट्रवादीसोबतच शिवसेनेकडून देखील दावा करण्यात आला आहे. या लोकसभा मतदारसंघात मंत्री छगन भुजबळ यांचं नाव आधी चर्चेत होतं. मात्र त्यांनी माघार घेतल्यानंतर शिवसेनेचे खासदार हेमंत गोडसे यांच्या नावाची चर्चा सुरू झाली आहे. मात्र अजूनही या जागेवर अद्याप तोडगा काढण्यात यश मिळालेलं नाहीये. शनिवारी भाजपच्या वतीनं उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघात उमेदवारीची घोषणा करण्यात आली आहे. या मतदारसंघातून ज्येष्ठ वकील उज्ज्वल निकम यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

# ‘महारेरा’गुन्ह्यातील डोंबिवली येथील बेकायदा इमारत भुईसपाट

**या कारवाईने भूमाफियांना मोठा तडाखा बसला आहे. या कारवाईने भूमाफियांचे सुमारे दोन ते तीन कोटीचे नुकसान झाल्याचे समजते.**



डोंबिवली : **निसर्ग चक्र टिम** - डोंबिवलीतील कुंभारखाणपाडा येथील हरितपट्ट्यात कल्याण डोंबिवली पालिकेच्या बांधकाम परवानग्या न घेता, महारेराचा नोंदणी क्रमांक मिळवून उभारलेली बेकायदा इमारत पालिकेच्या ह प्रभाग कार्यालयाचे साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांच्या तोडकाम पथकाने पोकलेन यंत्राच्या साहाय्याने भुईसपाट केली. पालिकेच्या बांधकाम परवानग्या न घेता अशा इमारतींना महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाचा (महारेरा) नोंदणी क्रमांक मिळवून या बेकायदा इमारतींमधील सदनिका ग्राहकांना बेमालुमपणे विकून त्यांची फसवणूक करण्याचा उद्देश भूमाफियांचा होता. याप्रकरणी प्रसिध्द वास्तुविशारद संदीप पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल केली होती. या याचिकेवरून तत्कालीन पालिका आयुक्त डॉ. भाऊसाहेब दांगडे यांनी अशी बेकायदाशीर कृती करणाऱ्या डोंबिवलीतील ६५ भूमाफियांवर नगररचना अधिकाऱ्यांच्या साह्याय्याने मानपाडा, रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहेत.

या गन्ह्यात कुंभारखाणपाडा येथील अजिंक्य नारकर आणि सुनील नारकर या बंधूंनी वास्तुरचना वास्तुविशारद फर्मचे पांडुरंग म्हात्रे यांच्या साहाय्याने उभारलेल्या सात माळ्याच्या बेकायदा इमारतीचा समावेश होता.

यापूर्वी या इमारतीवर दोन ते तीन वेळा जुजुबी कारवाई यापूर्वीच्या साहाय्यक आयुक्तांकडून करण्यात आली होती. हरितपट्ट्यातील अडगळीच्या जागेत असलेल्या या इमारतीचे पाडकाम साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली तोडकाम पथकाने मागील पधरा दिवसांपासून पोकलेन यंत्राच्या साहाय्याने सुरू केले होते.

या इमारतीवर कारवाई होऊ नये म्हणून अधिकाऱ्यांवर खूप राजकीय दवाव होता. परंतु, साहाय्यक आयुक्त सावंत यांनी हे दबाव न जुमानता आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, उपायुक्त अवधूत तावडे यांच्या आदेशावरून ही बेकायदा इमारत बुधवारी भुईसाट केली.

# सर्व शासकीय यंत्रणांनी एकमेकांशी उत्तम समन्वय साधून लोकसभा निवडणूका शांततेत पार पडतील या दृष्टीने काम करावे



ठाणे : **निसर्ग चक्र टिम** - देशात लोकसभा निवडणुकांचे बिगुल वाजले असून शेवटच्या पाचव्या टप्यातील निवडणुका येत्या २० मे २०२४ रोजी होत आहेत. ठाणे जिल्ह्यातील २३-भिवंडी,२४-कल्याण, २५-ठाणे या लोकसभा मतदारसंघातील निवडणुका नि:पक्षपातीपणे, शांततेत व भारत निवडणूक आयोगाने आखून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आदर्श आचारसंहितेचे पालन करुन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील सर्व नोडल अधिकाऱ्यांनी गांभीर्याने काम करावे, सर्व शासकीय यंत्रणांनी आपापसात उत्तम समन्वय साधावा, असे निर्देश ठाण्यात दाखल झालेल्या केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षकांनी आज बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती सभागृह, नियोजन भवन येथे निवडणूक खर्चाच्या अनुषंगाने आढावा बैठक आयोजित केली होती. या बैठकीस २३ भिवंडी मतदारसंघाचे केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक चित्तरंजन मांझी, २४ कल्याण मतदारसंघाचे केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक नकुल अग्रवाल, २५ ठाणे लोकसभा मतदारसंघाचे केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक श्री. चंद्र प्रकाश मीना व श्री. राहील गुप्ता उपस्थित होते. तसेच पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) डॉ. धोंडोपंत स्वामी, निवडणूक निर्णय अधिकारी २३-भिवंडी संजय जाधव, २४-कल्याण सुषमा सातपुते, २५-ठाणे मनिषा जायभाये, नोडल अधिकारी कायदा व सुव्यवस्था दीपक क्षीरसागर, नोडल अधिकारी आदर्श आचारसंहिता विजयसिंह देशमुख तसेच आयकर विभाग, पोलीस विभाग- ठाणे नवी मुंबई, मिरा-भाईंदर, वसई विरार आयुक्तालय, केंद्रीय वस्तू व सेवाकर, महसूल, गुप्तचर संचालनालय, सीमा शुल्क व केंद्रीय उत्पादन शुल्क, अंमली पदार्थ नियंत्रक ब्युरो, अंमलबजावणी संचालनालय, राज्य उत्पादन शुल्क, वस्तू व सेवाकर, राज्य परिवहन विभाग, बँक ऑफ महाराष्ट्र, अग्रणी बँक ठाणे, खर्च संनियंत्रण समिती २३-भिवंडी, २४-कल्याण , २५-ठाणे आदी सर्व विभागांचे जिल्हा समन्वय अधिकारी उपस्थित होते.यावेळी उपस्थित सर्व विभागांच्या जिल्हा समन्वय अधिकाऱ्यांकडून सद्य:स्थितीत सुरू असलेल्या कामांचा आढावा चारही निरीक्षकांनी घेतला. लोकसभा निवडणूक २०२४ या करिता निवडणूक आयोगाने राष्ट्रीयकृत बँका, को-ऑपरेटिव्ह बँका व खाजगी बँकांकडून होणाऱ्या मोठ्या व्यवहारांसाठी देण्यात आलेल्या क्यू-आर कोडच्या माध्यमातून झालेल्या आर्थिक व्यवहाराबाबत कशा प्रकारे कारवाई करण्यात आली याबाबतची माहिती घेतली. तसेच सी-व्हिजिल ॲपच्या माध्यमातून आलेल्या तक्रारींची माहिती घेवून कशा पध्दतीने कारवाई केली जात आहे, याबाबतही निरीक्षकांनी जाणून घेतले.

तसेच मुंबईची जीवनवाहिनी ही लोकल सेवा असून ठाणे, कल्याण, उल्हासनगर या परिसरात अनेक रेल्वे स्टेशन्स आहेत या माध्यमातून देखील मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर **उर्वरीत पान नं.३ वर ...**

# कोंकणातील तापमानात वाढ झाल्याने नागरिकांनी काळजी घ्या

**नवी मुंबई: निसर्ग चक्र टिम** - कोंकण विभागातील तापमानात वाढ झाल्याने उष्माघाताचे प्रमाण वाढले आहे. उष्णतेच्या लाटेमुळे होणारे गंभीर परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी दुपारी 12 ते 3च्या वेळी अनावश्यक घराबाहेर पडू नये. आपली आणि आपल्या कुटुंबियांची काळजी घ्यावी असे आवाहन कोंकण विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केले आहे.

वातावरणातील तापमान प्रमाणाबाहेर वाढले की शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची यंत्रणा कोलमडते. उष्माघात झाल्यावर चक्कर येणे, मळमळ, उलट्या होणे, डोकेदुखी, दरदरून घाम फुटणे, थकवा येणे स्नायूंना आकडी येणे अशी लक्षणे दिसू लागताच जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क करावा.


उष्माघात होऊ नये म्हणून तहान लागलेली नसली तरी-सुध्दा जास्तीत जास्त पाणी पिण्यात प्यावे, हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत, बाहेर जातांना गॉगल्स, छत्री/टोपी, बूट व चपलांचा वापर करण्यात यावा, प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी. कोंकणातील जनतेने काळजी घ्यावी .

उन्हाळ्यात त्रास होऊ लागल्यास जवळच्या शासकीय जिल्हा रुग्णालय अथवा तालुका किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क करावा. अनेक आरोग्य केंद्रात उष्णतेचा त्रास होणाऱ्या रुग्णांसाठी स्वतंत्र कक्षाची सोय करण्यात आली आहे.

# कल्याणमध्ये भटक्या कुत्र्याने घेतला चौदा जणांचा चावा; जखमीमध्ये ८ लहान मुलांचा समावेश!

**कल्याण : निसर्ग चक्र टिम** - कल्याण पूर्व येथील हनुमान नगर परिसरात एका भटका कुत्र्याने १४जणांना चावा घेतल्याची धक्कादायक घटना घडली आहे . नियोजन जर आपण आज सायंकाळी सात वाजताच्या सुमारास ही घटना घडली . धक्कादायक म्हणजे या जखमींमध्ये आठ लहान मुलांचा समावेश आहे . जखमींना कल्याण मधील रुक्मिणी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलंय .या घटनेनंतर केडीएमसीने या परिसरातील भटक्या कुत्र्याचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे .

# लोकलमधून पडून दोन जणांचा मृत्यू



**कल्याण : निसर्ग चक्र टिम** - डोंबिवली ते कोपर आणि दिवा ते मुंब्रा रेल्वे स्थानकांच्या दरम्यान या दुर्देवी घटना घडल्या आहेत छत्रपती शिवाजी टर्मिनसकडे जाणाऱ्या लोकलच्या डब्यात तुडुंब गर्दी असल्याने डब्यात शिरता न आल्याने लोकलच्या दरवाजात दाटीवाटीने उभे राहून प्रवास करणाऱ्या एका तरूणाचा, एका तरूणीचा दोन दिवसांत लोकलमधून पडून मृत्यू झाला आहे. डोंबिवली ते कोपर आणि दिवा ते मुंब्रा रेल्वे स्थानकांच्या दरम्यान या दुर्देवी घटना घडल्या आहेत. लोकलची संख्या वाढवुनही लोकल अपघातांचे प्रमाण कमी होत नसल्याने रेल्वे प्रशासनाची डोकेदुखी वाढली आहे. गेल्या वर्षात डोंबिवली ते दिवा रेल्वे स्थानकांच्या दरम्यान सुमारे ४०० हून अधिक प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. सुमारे ८०० हून अधिक लोकल मधून पडून जखमी झाले आहेत. रेल्वे अपघात टाळण्यासाठी रेल्वे प्रशासन विविध प्रकारच्या उपाययोजना करत आहेत. तरीही ही अपघातांची मालिका संपत नाही.

लोहमार्ग पोलीस ठाण्यात याप्रकरणांची नोंद करण्यात आली आहे. सोमवारी सकाळी डोंबिवली ते कोपर रेल्वे स्थानकांच्या दरम्यान रिया श्यामजी राजगोर (२६) या तरूणीचा मृत्यू झाला. डोंबिवली रेल्वे स्थानकात रियाने सोमवारी सकाळी मुंबईला जाणारी लोकल पकडली. डब्यातील गर्दीमुळे तिला डब्यात शिरता आले नाही. ती लोकलच्या दरवाजात उभी राहून प्रवास करत होती. डोंबिवली स्थानकानंतर लोकलने वेग घेतल्याने कोपर रेल्वे स्थानकाजवळ तिचा तोल गेला आणि ती रेल्वे मार्गात पडून जागीच मरण पावली.

ती ठाण्यातील एका बांधकाम कंपनीत कामाला होती. डोंबिवलीतील अवधेश दुबे या तरुणाचा दिवा-मुंब्रा रेल्वे स्थानकांच्या दरम्यानच्या खाडीत पडून मृत्यू झाला आहे. तो लोकलने मुंबईच्या दिशेने प्रवास करत होता. डब्यात गर्दी असल्याने तो दरवाजाला लटकून प्रवास करत होता. मुंब्रा खाडीजवळ लोकलच्या दरवाजाला त्याने धरलेला हात सटकला तो खाडीत पडला असे पोलिसांचे म्हणणे आहे. अवधेशची कार्यालयीन पिशवी गायब असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. यामध्ये काही घातपात असण्याचा संशय कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे. जाणकारांकडून मिळालेली माहिती अशी की, कोपर ते मुंब्रा रेल्वे स्थानकांच्या दरम्यान लोकल वेगात असताना रुळांवरून डबे दोन्ही बाजुला वेगाने कलताना दिसतात. यावेळी दरवाजात उभ्या असणाऱ्या प्रवाशावर आतील गर्दीचा भार येतो. किंवा त्या प्रवाशाला दरवाजाच्या दांडीला हात धरून उभे राहणे मुश्किल होते. यावेळी त्याचा तोल जाऊन तो रेल्वे मार्गात पडतो. त्यामुळे अशा अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

**निवडणूक निर्णय अधिकारी २४ - कल्याण लोकसभा मतदार संघ**

# केंद्रीय खर्च निरीक्षक नकुल अग्रवाल यांची कल्याण लोकसभा मतदार संघ कार्यालयास भेट!



‘एफएसटी/एसएसटी टीमने दक्षतेने काम करण्याच्या दिल्या सूचना!’

**कल्याण : निसर्ग चक्र टिम** - २४ – कल्याण लोकसभा मतदार संघासाठी नियुक्त केंद्रीय खर्च निरीक्षक नकुल अग्रवाल यांनी आज डोंबिवली (पू.) येथील २४-कल्याण लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांचे कार्यालयास भेट दिली.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते व १४४ -कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे सहा. निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांनी त्यांचे स्वागत केले. नकुल अग्रवाल यांनी खर्चविषयक पथकातील अधिकारी वर्गाची बैठक घेऊन त्यांना निवडणूकीच्या कामकाजाविषयी मार्गदर्शन केले. प्रामुख्याने ‘**एफएसटी/एसएसटी**’ पथकांनी दक्षतेने काम करण्याबाबत सूचना त्यांनी यावेळी दिल्या. तसेच खर्चाचे शॅडो रजिस्टर मधील नोंदी अदययावत ठेवणेबाबतच्या सूचनाही त्यांनी संबंधित अधिका-यांना दिल्या. सोशल मीडियावर दैनंदिन स्वरुपात प्रसिध्द होणा-या बातम्यांचे निरीक्षण करुन सदर बातम्या पेड न्यूज असतील तर तो खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात लावणेबाबतच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. सदर बैठकीस मुख्य लेखा परीक्षक शरद देशमुख, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, किरण भिलारे, २४ - कल्याण लोकसभा मतदार संघासाठी खर्च विषयक बाबींचे कामकाज बघणेकामी नियुक्त समन्वय अधिकारी दिलीप सूर्यवंशी , महापालिकेचे परिमंडळ १ उपायुक्त प्रसाद बोरकर त्याचप्रमाणे खर्च निरीक्षण पथकातील इतर अधिकारी उपस्थित होते.

# संपादकीय...



**“उठो, जागो और तब तक रुको नहीं,
जब तक की तुम अपना लक्ष्य प्राप्त नही कर लेते”**

## राजवटींच्या दीर्घायुष्याचे रहस्य



**जगातील सर्वात जुने ‘जावा’ नावाचे धरण प्राचीन मेसोपोटेमियातले. इ. स. पूर्व ३०००, म्हणजे पाच हजार वर्षांपूर्वीच्या या धरणाचे अवशेष सध्याच्या जॉर्डनमध्ये आहेत. एल. के. कुलकर्णी, लेखक भूगोल कोशाचे लेखक आणि भूगोलाचे निवृत्त शिक्षक आहेत.**

प्रदीर्घकाळ टिकलेल्या राजवटींनी जलव्यवस्थापन राजवाडयांपुरते सीमित ठेवले नाही. त्याचा लाभ सामान्य जनतेलाही दिला. जनतेच्या आर्थिक समृद्धीसाठीही प्रयत्न केला..

जगातील सर्वात जुने ‘जावा’ नावाचे धरण प्राचीन मेसोपोटेमियातले. इ. स. पूर्व ३०००, म्हणजे पाच हजार वर्षांपूर्वीच्या या धरणाचे अवशेष सध्याच्या जॉर्डनमध्ये आहेत.सध्या वापरात असलेले सर्वात जुने धरण प्राचीन इजिप्शियन साम्राज्यातील आहे. सीरियामधील ओरांटीस नदीवरील ‘होम्स’ धरण सुमारे साडेतीन हजार वर्षांपूर्वीच्या फॅरोहा सेटी या इजिप्शियन सम्राटाच्या काळातील आहे. त्यातून होम्स या शहराला पाणी पुरवले जाते. स्पेनमधील ‘प्रोसर्पिना’हे वापरात असलेले दुसरे प्राचीन धरण. ग्वाडियाना नदीच्या पार्डीलास या उपनदीवरील हे धरण मेरिडा या गावाजवळ आहे. तेथील ‘कॉर्नल्वो धरण’ आजही वापरात असलेले तिसरे धरण. ग्वाडियानाच्या अल्बारेगास या उपनदीवर बांधण्यात आलेल्या या धरणातून मेरिडा शहराला पाणी पुरवले जाते. ही दोन्ही धरणे रोमन साम्राज्याच्या काळात पहिल्या व दुसऱ्या शतकात उभारण्यात आली.

अशी इतरही जागतिक उदाहरणे आहेत. उदाहरणार्थ रोमन साम्राज्यातील जलवाहिन्या- इ.स.पूर्व चौथ्या शतकापासून पुढे ५०० वर्षे या जलवाहिन्यांचे बांधकाम व वापर सुरू होता. त्या दूर डोंगरावरील जलस्रोतापासून शहरांना पाणी-पुरवठा करत. दगडी बांधकाम व भव्य कमानी असणाऱ्या काही वाहिन्या ९० किलोमीटर लांब व अनेक मजली इमारतीएवढया उंचीवर होत्या. त्यांचा वापर सार्वजनिक स्नानगृहे, कारंजी, उद्याने, खाणकाम, शेती अशा विविध ठिकाणी होत असे. त्यापैकी ‘व्हीर्गो’सारख्या काही जलवाहिन्या आज २३०० वर्षांनंतरही वापरात आहेत.

भारतातही प्राचीन काळापासून जलव्यवस्थापन केले जाई. पण त्या कौशल्याचा वापर मुख्यत: राजवाडे, महाल व किल्ले यांना पाणीपुरवठय.ासाठी होत असे. शेती व सार्वजनिक कामांसाठी जलव्यवस्थापनाचे काही मोजके पण महत्त्वाचे प्रयत्न आपल्याकडे झाले. ‘कल्लनाई धरण’ किंवा ‘ग्रँड अनिकट’ हे भारतातील सर्वात प्राचीन व आजही वापरात असलेले जगातले चौथे धरण मानले जाते. दक्षिण भारतातील कारिकेल या चोल राजाच्या काळी इ.स.पूर्व पहिल्या ते दुसऱ्या शतकात कावेरी नदीवर हे धरण उभारण्यात आले. ते तंजावरपासून ४५ कि.मी. अंतरावर आहे. या धरणाच्या जवळ काही मैलांवर कावेरी नदीला उत्तरेकडील कोल्लेडम व दक्षिणेकडील कावेरी या दोन शाखा फुटतात. या दोन्ही शाखांच्या मध्ये श्रीरंगम हे बेट आहे. कावेरी प्रवाहातून वर्षभर पाणी वहात असल्याने तिच्या दक्षिणेचा भाग सिंचनाखाली होता पण कोल्लेडम शाखा पावसाळा सोडून कोरडी असे. त्यामुळे कल्लनाई धरण बांधून कावेरीचे जास्तीचे पाणी कोल्लेडम शाखेत वळवून तो परिसर सिंचनाखाली आणण्यात आला. या धरणाची लांबी ३२९ मी., उंची ४.५ मी. व रुंदी २० मी. आहे. हे धरण चोल राजांचा लोकाभिमुख दृष्टिकोन तसेच तत्कालीन ज्ञान व कौशल्याचे प्रतीक होते. पण दुर्दैवाने तो वारसा पुढे क्षीण झाला. नंतरच्या दोन हजार वर्षांत त्या धरणाच्या डागडुजीकडे कुणीही लक्ष दिले नाही. एकोणिसाव्या शतकापर्यंत त्यात गाळ साचून धरणाची उपयुक्तता संपुष्टात येऊ लागली. १८०४ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात कॅप्टन काल्डवेल व सर आर्थर कॉटन या अभियंत्यांनी उपाययोजना करून त्या धरणास जीवदान दिले. सध्या या धरणाचा लाभ सुमारे १३ लाख एकर जमिनीस मिळतो. २३०० वर्षांची प्राचीन पार्श्वभूमी, दणकट दगडी बांधकाम, देखणे स्थापत्य आणि लक्षावधी लोकांना जीवनदायी अस-णारे हे धरण तमिळनाडूत पर्यटकांचे एक प्रमुख आकर्षण स्थळ आहे.

चोल राजवटीनंतर माळव्यातील परमार राजांनी सिंचनाकडे लक्ष दिले. अकराव्या श-तकातील पराक्रमी, विद्वान भोज परमार राजाची तुलना विक्रमादित्याशी केली जाते. भोजपूर किंवा भोपाळ शहराची स्थापना, तसेच धरणे व तलावांची निर्मिती त्याने केली. त्याने बांधलेले भोजेश्वर मंदिर हे तलावाकाठी होते. त्याची निर्मिती तीन धरणे बांधून करण्यात आली होती. यापैकी एक धरण डोंगराच्या पायथ्याशी येणारे पाणी अडवण्यासाठी बेटवा नदीवर होते. दुसरे दोन डोंगरांच्या मध्ये मंडुआ गावाजवळ तर तिसरे धरण भोपाळजवळ होते.

अकराव्या शतकातील पांडय. राजवटीतील हजार वर्षांपूर्वीचे सिंचन व जलव्यवस्थापन आजही अनुकरणीय आहे. वैगेई, ताम्रपर्णी व कावेरीच्या साहाय्याने पांडयांनी तमिळनाडूचा मोठा भाग सिंचनाखाली आणला व दुहेरी पिके घेऊन शेतीस आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा बनवले. त्यांनी या नद्यांच्या खोऱ्यात बंधारे व तळी यांचे जाळेच उभारले. नद्यांच्या वरच्या भागात बंधारे बांधून, वाहिन्यांद्वारे पुराचे जास्तीचे पाणी खालच्या खोऱ्यात खोदलेल्या प्रचंड हौद किंवा तलावात साठवले जाई. यातून त्यांनी पुरावर नियंत्रण, सिंचन व नौकानयन साध्य केले. शेतीला पाणी पाळीपद्धतीने दिले जाई. बंधारे व कालव्यांच्या उभारणीत लोकांचाही सहभाग असे. तळी व वाहिन्यांच्या आजूबाजूची जमीन खरेदी करून तिचे अंशत: उत्पन्न तळे व बंधाऱ्याची दुरुस्ती यासाठी दिले जाई. सिंचनासंबंधीचे वाद, शेतकऱ्यांची नुकसानभरपाई याबाबत राजे व त्यांची यंत्रणा अतिशय जागरूक असल्याचे लिखित नोंदीवरून दिसते. यानंतर सिंचन पाणीपुरवठयाकडे लक्ष दिले ते दिल्लीच्या तोमर राजांनी. त्यापैकी अनंगपाल तोमर याने अकराव्या शतकात दिल्लीजवळ मेहरौली भागात लालकोट हा किल्ला व धरणे, तळी व विहिरींची निर्मिती केली. इ.स. १०६० मध्ये त्याने दक्षिण दिल्ली परिसरात निर्मिलेला ‘अनंगताल’ हा तलाव आता वारसास्थळ म्हणून घोषित करण्यात आला आहे. जवळच अरवली पर्वताच्या पायथ्याशी त्याने उभारलेल्या अनंगपूर धरणाचे अवशेष आजही दिसतात. त्याने बांधलेला सूरजकुंड हा प्रसिद्ध तलाव आणि अनेक विहिरी एक हजार वर्षांनंतरही अस्तित्वात आहेत.

चौदाव्या शतकात तुघलक काळात १३५५ मध्ये फेरोजशहा तुघलक याने यमुना नदीवर बंधारा बांधून कालव्याची निर्मिती केली. ब्रिटिश राजवटीत त्याची डागडुजी झाली. तो कालवा आजही वापरात आहे. यानंतर मात्र पाच-सहाशे वर्षे सिंचन पूर्णत: दुर्लक्षित राहिल्याचे दिसते. पुढे एकोणिसाव्या शतकापासून ब्रिटिश राज-वटीत भारतात अनेक धरणांची निर्मिती व दुरुस्ती करण्यात आली. फॅरोहा ३१२० वर्षे , रोमन साम्राज्य १४८० वर्षे, चोल १५०० वर्षे, परमार ५०० वर्षे, पांडय. १६०० वर्षे, तुघलक ८४ वर्षे, तोमर ४०० वर्षे. जगात व भारतातही बहुते-क राजवटी सामान्यत: दोन-अडीचशे वर्षे किंवा त्याहूनही कमी काळ राज्य करून गेल्या. त्यामुळे त्या राजवटींना आर्थिक स्थैर्यासोबत लोकाश्रय मिळून त्या दीर्घायुषी ठरल्या. या राजवटींच्या दीर्घायुष्याचे हेही रहस्य असेल का ?

# पूतना मावशीचे पर्यावरण प्रेम!

गेल्या महिन्यात लंडन परिसरातील काही रस्ते मोटार वाहतुकीसाठी पूर्ण बंद ठेवले गेले. स्थानिक रहिवाशांस त्यामुळे मोठी गैरसोय सहन करावी लागली; पण एकाच्याही मुखातून तक्रारीचा सूर उमटला नाही.

माळढोक पक्ष्यांचे संरक्षण हा सरकारसाठी प्राधान्यविषय नाहीच, पण सौरऊर्जा हवी म्हणणारे सरकार राखीव जंगलांलगत खाणींनाही परवाने देते!



गेल्या महिन्यात लंडन परिसरातील काही रस्ते मोटार वाहतुकीसाठी पूर्ण बंद ठेवले गेले. स्थानिक रहिवाशांस त्यामुळे मोठी गैरसोय सहन करावी लागली; पण एकाच्याही मुखातून तक्रारीचा सूर उमटला नाही. याच धर्तीवर ऑस्ट्रेलियन सरकार समुद्रकिनाऱ्यांवर जाण्यास पर्यटकांस वारंवार बंदी घालते. या किनाऱ्यावर अनेक पंचतारांकित हॉटेले आहेत. पण या बंदीमुळे आपले नुकसान होईल अशी एकही तक्रार तेथील सरकारकडे हॉटेले करीत नाहीत आणि हॉटेलवाल्यांची ‘लॉबी’ ही बंदी लादली जाणार नाही यासाठी प्रयत्न करीत नाही. ही दोन केवळ उदाहरणे. यातील पहिले लंडनमधील रस्त्यांवर मोटार वाहतूक बंदीचे. ही बंदी घातली गेली कारण तो त्या परिसरातील बेडकांचा विणीचा हंगाम असतो आणि त्या काळात बेडूक दाम्पत्ये शेजारच्या झाडीतून रस्त्यावर येतात. या काळात मोटार वाहतूक बंदी घातली नाही तर बेडूक-बेडकी गाडीखाली येण्याचा धोका असतो. म्हणजे मोटारींवरील बंदी ही बेडकांच्या सुखेनैव वंशवृद्धीसाठी. ऑस्ट्रेलियन सरकारकडून काही किनारे पर्यटकांसाठी मज्जाव-क्षेत्रे घोषित केले जातात कारण त्या विशिष्ट काळात स्थानिक पक्ष्यांचे प्रजनन होते आणि पर्यटकांचे कुतूहल त्यांच्या जिवावर उठण्याचा धोका असतो. या रम्य चित्रावर आपल्याकडे प्राणिमात्रांशी सार्वजनिक वर्तन कसे होते त्याचे स्मरण हा उतारा ठरेल. पिंजऱ्यांतील प्राणी शहाणे वाटावेत- तसे ते असतातच- असे बाहेरून त्यांच्याशी संवाद साधू पाहणारे मनुष्यप्राणी, झाडांवरच्या घरटयांची जराही फिकीर न करता सहज होणारी वृक्षतोड आणि ही पृथ्वी जणू आपल्याच मालकीची आहे असे एकंदर मनुष्य म्हणवून घेणाऱ्यांचे वर्तन हे आपले प्राक्तन. त्यावरील भाष्याचे निमित्त म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरणासंदर्भात दिलेला आदेश.

**–संकलन–
राजेंद्र श्रावण वखरे
(वृत्त संपादक)
निसर्ग चक्र**

विषय होता राजस्थान/ गुजरात या राज्यांतून उभारले जाणार असलेले उच्च दाब क्षमतेच्या वीज-वाहक वाहिन्यांचे जाळे. त्यास काही पर्यावरणवाद्यांनी आक्षेप घेतला. कारण या वीजतारांस धडकून मोठय.ा प्रमाणावर बळी पडणारे माळढोक (ग्रेट इंडियन बस्टर्ड) पक्षी. छोटे शहामृग वाटावे इतके आकाराने भव्य असणारे माळढोक एके काळी आपल्याकडे सर्रास आढळून येत. तथापि आता त्यांची संख्या शे-दोनशेवर आली असून हा पक्षी नामशेष होतो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पक्ष्याच्या मुळावर आलेल्या अनेकांतील एक महत्त्वाचे कारण म्हणजे उच्च दाब क्षमतेच्या वीजवाह-क तारा. या तारांतून जेव्हा वीज वाहत असते तेव्हा त्यांच्याभोवती एक चुंबकीय क्षेत्र तयार होते आणि त्यातून या अशा पक्ष्यांचा बळी जातो. हे वास्तव लक्षात घेऊन न्यायालयाने वीजवाहक तारा हवेतून न नेता जमिनीखालून नेल्या जाव्यात असा आदेश दिला. पण ते करणेही अवघड. याचे कारण जमिनीखालून न्यावयाच्या वाहिन्या अगदी जाडजूड लागतात आणि त्याहीपेक्षा मुख्य कारण म्हणजे त्या एकसलग लांब तयारच केल्या जात नाहीत. त्यामुळे अधिक जोड देणे आले आणि अधिक जोड म्हणजे अधिक वीजघट किंवा पारेषण हानी (ट्रान्स्पोर्ट अँड डिस्ट्रिब्युशन लॉसेस). म्हणून असे करणे अव्यवहार्य. गुजरात/ राजस्थानच्या सदर परिसरात मोठया प्रमाणावर सौरऊर्जा केंद्रे उभारली जाणार असून त्यांच्या अधिक आणि दूरवर वहनासाठी वीजवाहिन्यांचे जाळे उभारणे आवश्यक आहे. मग पक्ष्यांच्या जगण्याच्या हक्कांचे काय, हा प्रश्न. तो उत्तरासाठी अखेर सर्वोच्च न्यायालयात आला.

त्यावर आदेश देताना सर्वोच्च न्यायालयाने या वीजवहनासाठी कोणकोणते पर्याय उपलब्ध असतील याची पाहणी करण्यासाठी तातडीने तज्ज्ञांची समिती नेमण्याचा आदेश दिला आणि या समितीस जुलैअखेपर्यंतच निश्चित मुदतही घालून दिली. हे योग्यच. पण तसे करण्याचा आदेश देताना सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी पर्यावरण, नागरिकांचा स्वच्छ पर्यावरणाचा अधिकार, पर्यावरणस्नेही ऊर्जास्रोत इत्यादींविषयी भाष्य केले. ते अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण ते स्वच्छ पर्यावरणास नागरिकांच्या जगण्याशी जोडते. म्हणजे आपली राज्यघटना ज्याप्रमाणे सर्व नागरिक आणि जीवांस जगण्याचा हक्क देते त्याचप्रमाणे या जगण्याच्या हक्कासाठी नागरिक स्वच्छ पर्यावरणाची मागणी करू शकतात; किंबहुना तो त्यांचा मूलभूत हक्कच आहे, असा नि:संदिग्ध निर्वाळा सर्वोच्च न्यायालय देते. पर्यावरणप्रेमींनी दाखल केलेल्या या याचिकेस विरोध आहे तो अर्थातच सरकारचा. तो करताना या वीजवाहिन्यांची उभारणी ही किती अत्यावश्यक आहे, आंतरराष्ट्रीय करार, पर्यावरणस्नेही ऊर्जा निर्मितीची गरज इत्यादी कारणे सरकारने पुढे केली आणि सर्वोच्च न्यायालयानेही त्याचा सहानुभूतीने विचार करत त्यास दुजोरा दिला. इ.स. २०७० पर्यंत आपणास शून्य कर्बउत्सर्जनाचे उद्दिष्ट गाठावयाचे आहे त्यासाठी सौरऊर्जा निर्मिती किती आवश्यक इत्यादी मुद्दे सरन्यायाधीश या आदेशात मांडतात. ते रास्तच.

परंतु या देशातील सर्वात मोठा प्रदूषक हा सरकारच आहे याकडे कसे दुर्लक्ष करणार? बॅटरी-चलित वाहनांची मागणी मंदावत आहे हे वास्तव लक्षात घेण्यास सरकार तयार नाही आणि सौरऊर्जाही पूर्ण पर्यावरणस्नेही नाही, हे त्यास जणू ठाऊकच नाही. दिवसागणिक घटत जाणारी सौरऊर्जा निर्मिती क्षमता हे जसे यातील कटू वास्तव तसेच निरुपयोगी झालेल्या सौर विजेऱ्यांचे करायचे काय हीदेखील एक मोठी डोकेदुखी. हे सौरऊर्जा निर्मिती पत्रे प्लास्टिकपेक्षाही पर्यावरणास घातक. त्यांच्या विल्हेवाटीचे पर्यावरणस्नेही मार्ग अद्याप विकसित झालेले नाहीत. हे एक आव्हान. आणि दुसरे असे की अत्यंत पर्यावरणघातक खाण धोरण हीदेखील पर्यावरणप्रेमाचा आव आणणाऱ्या सरकारचीच निर्मिती याकडे काणाडोळा कसा करणार? सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रश्न आला तो माळढोक पक्ष्यांच्या निमित्ताने. पण वाघ आणि अन्य वन्यप्राण्यांच्या अधिवासाचे काय? वाघांसाठी अत्यावश्यक राखीव संरक्षण क्षेत्रांच्या लगत खाणींसाठी परवाने दिले जातात ते कोणाकडून? याविरोधात आवाज उठवणाऱ्यांची संभावना राष्ट्रद्रोही, प्रगतीस खीळ घालणारे अशी केली जाते. हे असे होणार नाही, ही जबाबदारी कोणाची? देशातील सर्वोच्च सत्ताधीशाच्या साक्षीने यमुना नदीच्या पात्रात सर्व पर्यावरण नियम धाब्यावर बसवून धर्म सत्संग आयोजित केला जातो आणि या नियमभंगासाठी दंड केला तरी तो दंड न भरण्याचे औद्धत्य हे गुरू दाखवतात ते कोणाच्या जिवावर? पर्यावरणीय नियमांचे निकष कोणाच्या सोयीसाठी बदलले जातात? आता सरकार पर्यावरणस्नेही ऊर्जानिर्मितीचे गोडवे गाताना दिसते. ते ठीक. पण या पर्यावरणस्नेही ऊर्जानिर्मितीत विद्यमान सरकारच्या काळात आघाडीचे स्थान मिळवणारा उद्योगसमूहच पर्यावरण-मारक खाण उद्योगात-ही आघाडीवर आणि त्याच्या दोन्ही परस्परविरोधी व्यवसाय कल्पनांस उत्तेजन देणारे सरकार, याचा ताळमेळ लावायचा कसा?

तेव्हा माळढोक पक्ष्यांच्या निमित्ताने सरकारने भले पर्यावरणस्नेही वीजनिर्मितीचा आधार ऊर्जा कंपन्यांसाठी शोधला असेल. पण सरकार ना धड पर्यावरणस्नेही ऊर्जानिर्मितीबाबत प्रामाणिक आहे ना माळढोक पक्ष्यांचे संरक्षण हा सरकारसाठी खऱ्या चिंतेचा विषय आहे. सरकारपुढे- मग ते कोणत्याही पक्षाचे असो- प्राधान्याने विचार असतो तो हितसंबंधरक्षणाचा. म्हणून पर्यावरणरक्षण आणि औद्योगिक विकास यात संतुलन साधण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयालाच उचलावी लागेल. तरच स्वच्छ पर्यावरण हे नागरिकांसाठी जगण्याच्या अधिकाराइतकेच महत्त्वाचे आणि मूलभूत या सर्वोच्च न्यायालयाच्या प्रतिपादनास काही अर्थ राहील. एरवी सरकारांचे पर्यावरणप्रेम हे पूतनामावशीचे असते हा अनुभव नागरिक घेत आहेतच.

# मोर हवा तर आपणच मोर व्हायचं!

**एक म्हातारी आणि तिची एक छोटी नात - लच्छी - गावाबाहेर राहत होती. एकदा तिच्या झोपडीपाशी एक मोर आला. मोराला पाहून लच्छी नाचू लागली. मोरही नाचू लागला. ..त्या गोष्टीतली मुलगी स्वत:च मोराइतकी उत्फुल्ल झाली, तसं आपल्यालाही स्वातंत्र्याचे वाहक होता आलं तर अनुच्छेद १९ सार्थ ठरेल.. – डॉ. श्रीरंजन आवटे**



एक म्हातारी आणि तिची एक छोटी नात – लच्छी – गावाबाहेर राहत होती. एकदा तिच्या झोपडीपाशी एक मोर आला. मोराला पाहून लच्छी नाचू लागली. मोरही नाचू लागला. लच्छीनं हट्ट धरला की मोराला अंगणातच बांधून ठेवावं. म्हातारी म्हणाली, ते कसं होणार? आपल्यापाशी त्याला खायला द्यायला दाणागोटा कुठं आहे? दोघींचा काही निर्णय होईना. तेव्हा मोरच म्हणाला, मी इथंच जवळपास राहीन. मला दाणागोटा काही नको. रान तर भवतालीच आहे; मात्र एका अटीवर. मी येईल तेव्हां लच्छीनं आधी नाचलं पाहिजे. ती नाचायची थांबली तर मी येणार नाही. अट साधी होती. लच्छी लगेच कबूल झाली. म्हातारीचंही काम झालं; पण नाचायचं म्हणजे काही साधी गोष्ट नव्हती. हुकमी नाचायचं; तर मनही तसंच हवं. लच्छी तेव्हापासून आनंदीच राहू लागली. मोर केव्हा येईल याचा नेम नसे. पुढं पुढं मोर येऊन गेला की काय याचंही तिला भान राहत नसे. हे सांगून निवेदिका म्हणते, या गोष्टीचं तात्पर्य सांगितलं जात नाही पण मला वाटतं, ‘‘मोर हवा तर आपणच मोर व्हायचं. जे जे हवं, ते ते आपणच व्हायचं.’’ ‘‘पु.शि.रेगे यांच्या ‘सावित्री’ या लघुकादंबरीतली ही गोष्ट. स्वातंत्र्य हवं तर आपलं मन मुक्त हवं, हे सांगणारं हे रुपक. एकदा हा आनंद गवसला की मोराच्या अस्तित्वाशिवाय नाचता येतं. स्वातंत्र्याचं अस्तित्व असं अटींच्या पलीकडे असू शकतं. स्वातंत्र्याचा हा अनोखा आयाम आपल्या लक्षात येतो. ब्रिटिश निघून गेले आणि देश स्वतंत्र झाला; मात्र स्वतंत्र होणं म्हणजे काय? ब्रिटिशांचा अभाव हाच स्वातंत्र्याचा अर्थ होता का? कशाचा तरी अभाव असणं हा स्वातंत्र्याचा भाग असू शकतो; मात्र स्वातंत्र्याची संकल्पना तेवढयापुरतीच मर्यादित नाही. स्वातंत्र्य हा मनाचा प्रवासही आहे. म्हणून तर गांधी म्हणतात- बी द चेंज यू बिलीव्ह इन. तुम्हाला ज्यावर विश्वास आहे तो बदल तुम्ही स्वत:च व्हा! एकदा हे करता आलं की लच्छीला मोरही होता येतं आणि आपल्याला स्वतंत्र परिवर्तनाचे वाहकही.

त्यातून स्वतंत्र विचार करण्याची प्रक्रिया सुरू होते. यातून जन्माला येते अभिव्यक्ती. अभिव्यक्ती हे विचारांचं प्रकटीकरण आहे. भारतीय संविधानाचा एकोणिसावा अनुच्छेद भाषणाच्या आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्काचं रक्षण करतो. हा अनुच्छेद सर्वाधिक वादग्रस्त आहे. संविधानसभेतही यावर दीर्घ चर्चा झाली. स्वातंत्र्योत्तर भारतात शेकडो खटले या अनुच्छेदाच्या अनुषंगाने झाले आहेत; कारण हा अनुच्छेद मूलभूत स्वरूपाचाच आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांइतकीच अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य ही महत्त्वाची गरज आहे. फ्रेंच तत्त्वज्ञ देकार्त म्हणतो, ‘मी विचार करतो म्हणून मी अस्तित्वात आहे“. अभिव्यक्ती हे विचारांचं प्रकटीकरण असल्यानं ती जिवंतपणाची खूण आहे. त्यामुळे कोणत्याही राजकीय व्यवस्थेत अभिव्यक्ती स्वातंत्र्याची कार्यकक्षा काय आहे, हे महत्त्वाचं ठरतं. त्यानुसार राज्यसंस्था आणि संविधान किती उदार आहे, हे ध्यानात येतं. भारतीय संविधानानं अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार मान्य केल्यामुळे मुक्तीचा दरवाजा खुला झाला कारण अभिव्यक्ती हा श्वास आहे.

बहिणाबाई चौधरी म्हणतात- अरे जगनं मरनं एका सासाचं अंतर. हे श्वासाचं अंतर अभिव्यक्त होता येतं की नाही याच्यामधलंच आहे. त्यासाठी स्वतंत्र बुद्धीनं विचार करण्याची प्रक्रिया विकसित व्हावी लागते; त्यामुळेच अभिव्यक्तिस्वातंत्र्य हा गुणात्मक जीवनाचा अविभाज्य असा भाग आहे, हे विसरता कामा नये.

# २७ वर्षीय तरुणीची हत्या! मृतदेह आढळला सुटकेसमध्ये!

**'लव्ह जिहाद' असल्याचा आरोप**

**मानखुर्द मधील साठेनगर मध्ये राहणाऱ्या पूनमची निर्घृण हत्या करून तिचा मृतदेह सुटकेसमध्ये टाकला होता.**

**क्राईम**

**सौ.सिमा वखरे**

नवी मुंबई : नवी मुंबईत दहा दिवसांपूर्वी बेपत्ता झालेल्या २७ वर्षीय पूनम क्षीरसागर नावाच्या तरुणीचा मृतदेह एका सुटकेसमध्ये आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.चाँद नावाच्या मुलासोबत ती बेपत्ता झाली होती. मानखुर्दमधील साठेनगरमध्ये राहणाऱ्या पूनमची निर्घृण हत्या करून तिचा मृतदेह सुटकेसमधून टाकला होता. आता तिची हत्या लव्ह जिहाद असल्याचा आरोप भाजपने केला आहे.

आली. डाव्या हातावर एस तर दुसऱ्या हातावर सूरज असा टॅटू होता.वरिष्ठ पोलिसांनी सांगितले की, ओळख पटल्यानंतर आम्-ही चौकशी सुरू केली. तेव्हा तरुणी चार वर्षांपासून नागपाडा इथं एका टॅक्सी चालकासोबत रिलेशनमध्ये होती असं समोर आलं. याबाबत कुटुंबियांना माहिती नव्हती. पोलिसांनी २८ वर्षीय निजामुद्दीन अलीला मानखुर्दमधून आटक केलीय. त्याने चौकशीत आपला गुन्हा मान्य केला आहे.

पूनम क्षीरसागर ही दहा दिवसांपूर्वी निजाम नावाच्या मुलासोबत बेपत्ता झालेली होती. दहा दिवसानंतर एका सुटकेसमध्ये तिचा मृतदेह सापडल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या निर्घृण हत्येनंतर स्थानिक हिंदू समाजामध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. - मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी पीडित तरुणीच्या कुटुंबियांची भेट घेऊन केले सांत्वन. तसेच दोषीला कठोर शिक्षा होण्यासाठी पूर्ण प्रयत्न करू, असे आश्वासन दिले. माध्यमांशी संवाद साधताना लोढा म्हणाले, मुंबईतील ही तिसरी घटना आहे. त्यामुळे पोलिसांनी याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

गुरुवारी सकाळी उरणमध्ये पूनमचा मृतदेह कुजलेल्या आणि छिन्नविछिन्न अवस्थेत आढळून आला. आई आणि भावाने मृतदेह ओळख-ला. तिच्या केसांना असलेली क्लीप, दोन बोटांमधली अंगठी आणि कपड्यांसोबत एक बांगडी यावरून तिची ओळख पटवण्यात सँडहर्स्ट रोडवर घरकाम करणारी पूनम १८ एप्रिलला कामासाठी घरातून निघाली पण ती परतलीच नव्हती. तिच्या कुटुंबियांनी पूनम बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली होती. अलीने पोलिसांकडे असा खुलासा केला की, पूनम धोका देत असल्याचा संशय होता आणि यावरून दोघांमध्ये वादही होत होता.

१८ एप्रिलला कामानंतर तिला जेजे हॉस्पिटलजवळ यायला सांगितलं होतं. तिथून कल्याणमध्ये खडावली नदी किनारी तिची गळा आवळून हत्या केली. पूनमचा मृतदेह एका पोत्यात घालून उरणच्या चिरनेर इथं फेकून दिला. टॅक्सी ड्रायव्हर असल्यानं त्या ठिकाणाबद्दल आपल्याला माहिती होती असंही अलीने सांगितलं. मूळचा उत्तर प्रदेशातील लखनऊचा असलेला अली विवाहित आहे. त्याला दोन वर्षांचा मुलगासुद्धा आहे. तर पीडित पूनम क्षीरसागर ही अविवाहित होती. ती आई, भाऊ यांच्यासोबत राहत होती.

# 'या' गावात आहेत फुलपाखरांच्या वेगवेगळ्या ८५ पेक्षा जास्त प्रजाती!

**पुण्यातील भोर तालुक्यातील पिसावरे गावाला या फुलपाखरांचे गाव असं म्हटलं जातं. निर्सगसंपन्न असलेल्या या गावातील रहिवाशांनी निसर्गाची जोपासना केली.**



पुणे : फुलपाखराचे आकर्षण हे लहानग्यांपासून ते मोठ्यांपर्यंत सग ळ्यांना असतं. पुण्यातील एका गावाला फुलपाखरांचे गाव असं म्हटलं जातं. निर्सगसंपन्न असलेल्या या गावातील रहिवाशांनी निसर्गाची जोपासना केली. यामुळेच निसर्गानेही त्यांना ही फुलपाखराचं गाव अशी ओळख या गावाला बहाल केली आहे. पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील पिसावरे या गावाला फुलपाखरांचे गाव म्हणून ओळखलं जातं आहे.

ही ओळख येथील शाळेत शिकणाऱ्या लहानग्या विद्यार्थ्यांनी मिळवून दिली आहे.

या ठिकाणी रंगींबेरंगी फुलपाखरे आढळून येतात. यासाठी भोर एज्युकेशन सोसायटीच्या पिसावरे माध्यमिक विद्यालयातील शिक्षक संतोश दळवी यांनी मेहनत घेतली.

# 'कामगार दिन' साजरा करण्यासाठी '१ मे' हीच तारीख का निवडली गेली?




आंतरराष्ट्रीय कामगार दिन १ मे रोजी जगभरात साजरा केला जातो. याला कामगार दिन किंवा लेबर डे असेही म्हणतात. मात्र अनेक देशांमध्ये तो वेगवेगळ्या दिवशी साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश लोकांना मजूर आणि त्यांच्या समस्यांची जाणीव करून देणे हा आहे.

१३५ वर्षांपूर्वी अमेरिकेत या दिवसाची सुरुवात झाली. या दिवशी, हजारो अमेरिकन कामगारांनी त्यांच्या कामाची परिस्थिती सुधारण्यासाठी संप सुरू केला. त्यांचा कामाचा वेळ १५ तासांवरून ८ तासांवर आणायचा होता. यासाठी लोकांना खूप संघर्ष करावा लागला. शेवटी त्यांना यश मिळाले. तेव्हापासून १ मे हा दिवस केवळ कामगार क्रांतीच्या यशासाठीच नव्हे तर जगभरातील कामगारांच्या हितासाठी आणि सन्मानासाठी साजरा केला जाऊ लागला.

अमेरिकेतून झाली सुरुवात..

कामगार दिन साजरा करण्यामागचे कारण म्हणजे १ मे १८८६ पासून अमेरिकेत सुरू झालेली निदर्शने. मिळालेल्या माहितीनुसार, तेथील कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांनी कामाचे तास आठ करण्याची दीर्घ मागणी केल्यानंतर काम बंद केले होते. संप सुरू होऊन चार दिवसही उलटले नव्हते, तेव्हा अमेरिकेतील शिकागो येथील हे मार्केटमध्ये स्फोट झाला. यानंतर ४ मे रोजी झालेल्या स्फोटाला प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनी आंदोलक कामगारांवर अंदाधुंद गोळीबार केला. यामध्ये अनेक मजुरांना जीव गमवावा लागला. त्यामुळे दहशतीचे आणि संतापाचे वातावरण देशभर पसरले. अखेर प्रशासनाला नमते घेत कामगारांच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या. मात्र अमेरिकेत राष्ट्रीय कामगार दिन सप्टेंबरच्या पहिल्या सोमवारी साजरा केला जातो.

भारतात कशी झाली कामगार दिनाची सुरुवात?

भारतात कामगार दिन फक्त १ मे रोजीच साजरा केला जातो. भारतात १९२३ मध्ये चेन्नईमध्ये डाव्या विचारसरणीने कामगार दिन पहिल्यांदा साजरा केला. यानंतर देशातील अनेक कामगार संघटनांनी हा दिन स्वीकारला आणि आज १ मे हा दिवस देशात कामगार दिन म्हणून साजरा केला जातो.

कामगार दिन फक्त १ मे रोजीच का?

शिकागोच्या घटनेनंतर, जेव्हा युरोपमध्ये कामगारांसाठी संप आणि निदर्शने सुरू होती, तेव्हा १ मेची निवड करण्यात आली. शिकागो चळवळीमुळे आठवड्यातून एक दिवस सुट्टी म्हणून ठेवला होता. त्याच वेळी या चळवळीनंतर १ मे १८९० हा युरोप आणि अमेरिकेतील व्यापक निदर्शनांसाठी पहिला दिवस निवडला गेला. हळुहळू जेव्हा जेव्हा कामगारांसाठी कोणतेही मोठे आंदोलन किंवा संपाचे आयोजन करावे लागले तेव्हा ते १ मे रोजीच आयोजित केले जाऊ लागले. आजही जगातील अनेक देशांमध्ये १ मे हा दिवस कामगारांसाठी सुट्टीचा दिवस आहे. कॅनडामध्ये १८९४ पासून सप्टेंबरच्या पहिल्या सोमवारी कामगार दिन साजरा केला जातो. येथील कामगारांच्या लढ्याला स्वत:चा वेगळा इतिहास आहे. पण अमेरिकेतील कामगार चळवळींमध्येही समन्वय निर्माण झाला आहे. त्यामुळे अमेरिकेप्रमाणे कॅनडामध्येही याच दिवशी कामगार दिन साजरा केला जातो. या दिवशी कॅनडामध्येही सुट्टी असते. ज्या देशांमध्ये कामगार दिन साजरा केला जात नाही त्यात काही आफ्रिका, काही आखाती देश आणि मंगोलिया यांचा समावेश होतो. जपानमध्ये २३ नोव्हेंबर रोजी थँक्सगिव्हिंग डेसह कामगार दिन साजरा केला जातो. पण ऑस्ट्रेलियात प्रत्येक राज्याचा कामगार दिन वेगळा असतो. कझाकस्तानमध्ये सप्टेंबरचा शेवटचा रविवार हा कामगार दिन असतो.

**: निसर्ग चक्र : मुख्य कार्यालय : आई द्रौपदा बिल्डिंग, ३०४, शंकेश्वर पाम्सजवळ, साई बाळाराम कॉम्प्लेक्स समोर, खंडोबा मंदीर रोड, डोंबिवली (प.) ता.कल्याण जि. ठाणे - ४२१२०२मोबा. ९६१९६३००३५ / ९९८७४९६१३६**

# आरोग्य चांगले राहण्यासाठी काय करावे



आहार - दैनंदिन जेवणात स्निग्ध पदार्थ, खनिज इत्यादी घटक तत्त्वांनी युक्त सकस व संतुलीत नियमित पुरेसा आणि ताजा आहार व्यक्तीला मिळाल्यास आरोग्य लाभते. आहारावर आरोग्य विषयक स्थिती अवलंबून असते.

स्वच्छता - व्यक्तीच्या खाण्यापिण्यामध्ये स्वच्छता, स्वच्छतेमुळे आरोग्याला पोषक स्थिती निर्माण होते. अस्वच्छतेमधून मलेरिया, गास्ट्रो इत्यादी सारखे रोग उदभवतात. वैयक्तिक व सार्वजनिक पातळीवर व्यक्तीने स्वच्छतेची काळजी घेतली पाहिजे. ज्यामुळे आरोग्य चांगले राहते.

करमणूक - मनोरंजनातून व्यक्तीला आनंद मिळतो. मानसिक स्वास्थ लाभते. जीवन सुखी समाधानी बनते. व्यक्ती जेव्हा उदासिन बनतो, तेव्हा तो मनोरंजनाचा आधार घेतो. सुयोग्य मनोरंजनामुळे व्यक्तीला शारीरिक, मानसिक स्वास्थ लाभते.

व्यायाम व विश्रांती - व्यायामामुळे व्यक्तीला आपला आरोग्यविषयक दर्जा उंचावता येतो. नियमित व सुयोग्य व्यायाम असल्यास निरोगी, दीर्घकालीन, सुदृढ आरोग्य लाभते. रोगप्रतिकारक शक्ती वाढते. व्यायामाबारोबच विश्रांतीही तेवढीच महत्त्वाची आहे. आरोग्य आणि विश्रांती तेवढीच महत्त्वाची आहे. आरोग्य आणि विश्रांती या दोन्ही प्रक्रिया अंतरिक सहसंबंध आहे. व्यक्तीचे शरीर म्हणजे यंत्र नव्हे. विशिष्ट काळापर्यंत व्यक्ती एखादेच काम करू शकते. पुन्हा तिला थकवा येतो. तेव्हा विश्रांती गरजेची असते. योग्य प्रसंगी चांगल्या प्रकारची विश्रांती घेतल्यास विश्रांती नंतर व्यक्तीचे शरीर उत्साही बनते व कार्यक्षमता वाढण्यास मदत होते.

नोकरी - साधारणपणे व्यक्ती दोन प्रकारचे कार्य करते. बैठया स्वरुपाची आणि बौद्धीक स्वरुपाची काही कामे फारशी शारीरिक ताण न पडता व्यक्तीला करावी लागतात. काही कामे व्यक्तीला प्रत्यक्ष शारीरिक कष्ट करून आपली शक्ती उर्जा खर्च करून करावी लागतात. उदा. शेतमजूर, हमाल, कारखान्यातील कामगार इत्यादी व्यक्ती शारीरिक कष्टाची कामे करतात. कामाच्या स्वरूपावर आरोग्य विषयक स्थिती अवलंबून असते.

नोकरी करत असतांना मानसिक समाधान असणे अत्यंत गरजेचे आहे. मानसिक स्थिती व कामावरील वातावरण याचा देखील आरोग्यावर परिणाम होत असतो. म्हणून आनंदी वातावरणात काम केल्याने उत्साह वाढतो व कार्यक्षमता सुद्धा वाढण्यास मदत होते.

पर्यावरण - सभोवतालच्या परिस्थितीचा परिणाम आरोग्यावर होतो. व्यक्तीच्या कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक, सामाजिक स्थिती समतोलाची राहू शकेल असे पर्यावरण लाभल्यास आरोग्याचा दर्जा उंचावतो

अशाप्रकारे व्यक्तीचे आरोग्य जपण्यासाठी किंवा व्यक्तीच्या आरोग्यासाठी वरील घटक महत्त्वपूर्ण असतात. जर व्यक्तीस आरोग्याने साथ दिली तर त्या व्यक्तीस ते काम करण्यास सांगेल ते काम करता येणार नाही. शरीर व मन निरोगी असणे ही व्यक्तीच्या दृष्टीने चांगले समजले जाते. कोणत्याही प्रकारचा वैद्यकीय उपचार न घेता व्यक्ती आपले जीवन जगात. तिच व्यक्ती खऱ्या अर्थाने सर्व बाबतींमध्ये श्रीमंत असते. ज्या व्यक्तीजवळ खूप पैसा आहे व त्यास रोगाने जर केले तर अशा व्यक्तीस जीवन जगणे कठीण जातेएखादी व्यक्ती जर निरोगी असेल तर संपूर्ण समाज सुद्धा निरोगी असावा लागतो. पण सर्व समाजामधील माणसे हे या ना त्या रोगाने आजारी पडलेले असतात. त्यामुळेच देशाच्या सर्वांगीण प्रगतीवर यांचा परिणाम पडतो.

ज्या देशातील समाज हा निरोगी असतो तो देश हा प्रगतीचा शेवटच्या बिंदूवर जावून पोहोचतो म्हणून या सर्व बाबींसाठी आरोग्य महत्त्वाचे असते. म्हणून दैनंदिन जीवनामध्ये आरोग्याला विशेष महत्त्व आहे व आपण त्याची काळजी घेतली पाहिजे. आरोग्य बिघडल्यावर सुधारत बसण्यापेक्षा, आरोग्य बिघडू नये म्हणून काळजी घेणे हे आपल्या प्रत्येकाच्या हातात आहे . म्हणतात ना "आपले आरोग्य आपल्या हाती" काळजी घ्या स्वत:ची.

# चांगली आणि सुंदर त्वचा पाहिजे आहे? मग 'हे'घरगुती उपाय!



प्रत्येकाला सुंदर दिसण्याची इच्छा असते. त्वचा चांगली नसेल तर चेहऱ्यावरचा मेकअप फार चांगला दिसत नाही.

प्रत्येकाला सुंदर दिसण्याची इच्छा असते. त्वचा चांगली नसेल तर चेहऱ्यावरचा मेकअप फार चांगला दिसत नाही. आपली त्वचा चमकदार आणि चांगली तुम्हाला दिसावी वाटत असेल तर आपल्या त्वचेची विशेष काळजी घ्या. दरवेळी बाजारातून महागडे उत्पादने आणून वापरून आपली त्वचा काही काळासाठी चांगली होते. मात्र, जर तुम्हाला कायमसाठी त्वचा चांगली पाहिजे असेल तर चला, त्वचा सुधारण्यासाठीच्या या टिप्स जाणून घेऊया आपण तिळाच्या तेलानी रोज मालिश करायला पाहिजे. चेहऱ्याच्या त्वचेवरील अस्वच्छता साफ करण्यासाठी तिळाच्या तेलाची मदत होते. या तेलामुळे चेहऱ्यावरील डाग देखील निघून जातात. दररोज रात्री झोपताना तिळाच्या तेलाने मालिश करावी आणि सकाळी पाण्याने धुवावे.-जर तुमच्या चेहऱ्यावरील त्वचा कोरडी पडत असल्यास ताज्या दुधावरची मलई चेहऱ्यावर लावावी. त्यानंतर हलक्या हातांनी चेहऱ्याला मालिश करावी. मुलतानी माती पाण्यात भिजवून काही वेळ ठेवा. त्याचं मिश्रण चेहऱ्यावर लावा. यामुळे त्वचा देखील तजेलदार होते. जर आपली त्वचा तेलकट असल्यास याचा जास्त फायदा होईल.-चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवण्यासाठी बदामाच्या तेलाचा फायदा होतो. या तेलाची मालिश केल्यास चेहऱ्याचं सौंदर्य अधिक खुलायला लागतं.

-बेसन पीठ, चंदन आणि पीठ एकत्रीत करुन त्यांचे मिश्रण तयार करा आणि चेहऱ्यावर लावा. यामुळे चेहऱ्याच्या त्वचेवरील अस्वच्छता साफ होऊन चेहरा तजेलदार दिसू लागेल.

★★★




# सर्व शासकीय यंत्रणांनी एकमेकांशी उत्तम समन्वय साधून लोकसभा निवडणूका शांततेत पार पडतील या दृष्टीने काम करावे

**पान नं. १ वरुन...** कॅशची ने-आण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे नमूद करीत रेल्वे स्टेशनवर पोलीस विभागाच्या माध्यमातून आरपीएफची नेमणूक करण्याच्या सूचनाही त्यांनी या बैठकीत दिल्या. मतदानाचे शेवटचे चार दिवस हे अतिशय महत्वाचे असून या दिवसांत आरपीएफची कुमक वाढवावी, असेही त्यांनी नमूद केले.

१३७ भिवंडी, १४६ ओवळा, १५० ऐरोली हे विधानसभा मतदारसंघ संवेदनशील असून या ठिकाणच्या नोडल अधिकाऱ्यांना या ठिकाणी जास्त लक्ष केंद्रीत करुन कायदा व सुव्यवस्थेबाबत योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. सर्व विभागांचे अधिकारी हे आपापले काम करीत असताना जर एखादी बाब आपल्या अखत्यारित नसेल पण जर त्या ठिकाणी काही आढळून आल्यास ते संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधून तातडीने कळविण्यात यावे. आपण सर्वजण करीत असलेले निवडणुकीचे काम हे टीम वर्क आहे. त्यामुळे व्हॉटसॲप ग्रुपच्या माध्यमातून एकमेकांशी संवाद साधत प्रत्येकांने काम करावयाचे आहे, असेही केंद्रीय खर्च निरीक्षकांनी यावेळी नमूद केले.

बैठकीच्या सुरुवातीस जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी पुष्पगुच्छ देऊन सर्व खर्च निरीक्षकांचे स्वागत केले. प्रास्ताविक खर्च नियंत्रण समितीचे नोडल अधिकारी सत्यवान उबाळे यांनी केले.

सूत्रसंचलन मुख्य वित्त व लेखा अधिकारी वैजनाथ बुरडकर यांनी केले. बैठकीच्या शेवटी एकत्रित मीडिया कक्ष व माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण नोडल अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांनी उपस्थित केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक आणि उपस्थित नोडल अधिकाऱ्यांचे आभार मानले.

# समुद्रातील पाण्याचे प्रमाण वाढता वाढता वाढे !

## आपल्या आयुष्यावर होणार काय परिणाम ?

> जागतिक समुद्र पातळी किती वेगाने वाढत आहे ? - नॅशनल ओशनिक अॅण्ड अॅटमॉस्फेरिक अॅडमिनिस्ट्रेशन च्या अहवालानुसार, १८८० पासून जागतिक समुद्र पातळी सुमारे आठ ते नऊ इंच किंवा २१ ते २४ सेंटीमीटरने वाढली आहे. परंतु, अधिक चिंताजनक बाब म्हणजे १९९३ पासून वाढीचा हा दर वेगाने वाढत आहे. १९९३ मध्ये हा दर ०.०७ इंच किंवा ०.१८ सेंटीमीटर प्रतिवर्ष होता; जो आता ०.४२ सेंटीमीटर झाला आहे, म्हणजे हा दर दुपटीपेक्षा जास्त झाला आहे.

**(निसर्ग चक्र टीम)** : - हवामान बदलामुळे समुद्राच्या पाण्याच्या पातळीत वेगाने वाढ होत आहे. त्यामुळे मानवी आयुष्याला धोके निर्माण होत आहेत. नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागत आहे. चीनच्या किनारपट्टीचा एक-चतुर्थांश भूभाग समुद्रसपाटीच्या खाली बुडणार आहे. जमीन कमी झाल्यामुळे आणि हवामान बदलामुळे कोट्यवधी लोकांना पूर परिस्थितीचा सामना करावा लागणार आहे, असे शुक्रवारी सायन्स जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका नवीन अभ्यासात सांगण्यात आले आहे. चीनमधील भूभाग कमी होणे हा प्रामुख्याने जलद शहरीकरणाचा परिणाम आहे. अतिरिक्त उत्खननामुळे इमारती जमिनीत धसत आहेत. हवामान बदलामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे, ज्यामुळे समुद्राची पातळी वाढत आहे. समुद्र पातळीतील वाढ ही बाब केवळ चीनपुरती मर्यादित राहिलेली नसून, ती एक जागतिक समस्या आहे आणि दिवसागणिक तिची व्याप्ती वाढत आहे. यूएन अहवालानुसार समुद्र पातळीत वेगाने होणारी वाढ १३० दशलक्ष ते अर्धा अब्ज लोकांवर परिणाम करणारी ठरेल, असा अंदाज आहे. हवामानातील बदलामुळे समुद्राची पातळी कशी वाढते ? याचा मानवी जीवनावर काय परिणाम होईल ? याबद्दल जाणून घेऊ.

हवामान बदलामुळे समुद्राच्या पाण्याच्या पातळीत वेगाने वाढ होत आहे.

समुद्र पातळीत वेगाने होणारी वाढ

२०२२ ते २०२३ या कालावधीत जागतिक समुद्राची सरासरी पातळी सुमारे ०.३ इंच किंवा ०.७६ सेंटीमीटरने वाढली आहे. तज्ज्ञांनी सांगितले की, एल निनोच्या (पॅसिफिक महासागरात तयार झालेली हवामान स्थिती) वाढीमुळे दोन वर्षांदरम्यान जागतिक समुद्र पातळीत मोठी वाढझाली आहे. परंतु, आता एल निनो कमकुवत होत असल्याने, समुद्र पातळीच्या वाढीचा वेग कमी होण्याची शक्यता आहे.

नासाच्या समुद्र पातळी बदल टीम आणि वॉशिंग्टनमधील महासागर भौतिकशास्त्र कार्यक्रमाच्या संचालक नाड्या विनोग्राडोव्हा शिफर यांच्या मते, "सध्याच्या दरांचा अर्थ असा आहे की, २०५० पर्यंत जागतिक सरासरी समुद्र पातळीत आणखी २० सेंटीमीटर वाढ होण्याची शक्यता आहे. मागील १०० वर्षांच्या तुलनेत पुढील तीन दशकांमध्ये बदलाचे प्रमाण दुप्पट होईल आणि पूर परिस्थितीचा धोका वाढेल.

हवामान बदलामुळे समुद्राच्या पातळीत कशी वाढ होत आहे ?

समुद्र पातळी वाढण्यामागील प्रमुख कारण म्हणजे ग्लोबल वॉर्मिंग. जगभरातील तापमान दिवसागणिक वाढत आहे. हिमनद्या व बर्फाचे थर वितळत आहेत आणि समुद्रात पाणी भरत आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे महासागरदेखील अधिक उष्ण होत आहे. त्यामुळेही समुद्राची पातळी वाढत आहे.

NOAA अहवालात म्हटले आहे की, १९७० पासून बर्फ वितळणे आणि वाढती उष्णता समुद्राच्या पातळीत वाढ होण्याचे मुख्य कारण आहे. पर्वतीय हिमनद्या आणि बर्फ वेगाने वितळत आहेत. उदाहरणार्थ, २०२३ च्या अभ्यासात असे आढळून आले की, ग्रीनलँडमधील हिमनद्या २० वर्षांपेक्षा पाच पट वेगाने वितळत आहेत. बर्फ वितळल्यामुळे २००५ व २०१२ दरम्यान समुद्राच्या पातळीत वाढ होण्याचे



प्रमाण जवळजवळ दुप्पट झालेय, असेही या अहवालात सांगण्यात आले आहे. पर्वतीय हिमनद्या आणि बर्फ वेगाने वितळत आहेत.

समुद्र पातळी महत्त्वाची का ?

समुद्राच्या पातळीत वाढ होण्याचा सर्वांत वाईट परिणाम म्हणजे किनारी भागात येणारा पूर. भारतातील किनारी शहरांचे उदाहरण द्यायचे म्हटले तर, RMSI या जागतिक जोखीम व्यवस्थापन संस्थेच्या २०२२ च्या विश्लेषणात असे आढळून आले की, मुंबई, कोची, मंगलोर, चेन्नई, विशाखापट्टणम व तिरुवनंतपुरममधील काही महत्त्वाच्या रस्त्यांचे जाळे २०५० पर्यंत पाण्याखाली जाईल. भारतातही समुद्राची पातळी वेगाने वाढत आहे.

इंडोनेशियासारख्या बेटयुक्त देशांची परिस्थिती तर अधिक वाईट आहे. २०१९ मध्ये इंडोनेशियाने जाहीर केले की, देशाची राजधानी जकार्ताला पुराचा धोका आहे. त्यामुळे ही राजधानी बोर्नियो बेटावरील पूर्व कालीमंतन प्रांतात हलवली जाईल. समुद्राच्या पातळीच्या वाढीमुळे अधिक तीव्र वादळे निर्माण होत आहेत. समुद्राच्या पाण्याच्या पातळीत झालेल्या वाढीमुळे पूरस्थिती निर्माण होत असून, किनारी भागांचे नुकसान होत आहे.

समुद्राच्या पातळीत वाढ झाल्यामुळे खारे पाणी गोड्या पाण्यातील जलचरांना दूषित करीत आहे. वेळीच पावले उचलली नाहीत, तर माणसासह निसर्गालाही धोका निर्माण होईल आणि पक्षी व प्राण्यांच्या अनेक प्रजाती नष्ट होतील.

# डोंबिवलीतील मोठागाव माणकोली पूल चार दिवस वाहतुकीसाठी बंद



**डोंबिवली : निसर्ग चक्र टिम** -

डोंबिवलीतील मोठागाव येथील माणकोली उड्डाण पूल पुलाच्या वजन भार तपासणीच्या कामासाठी सोमवार २९ एप्रिल ते गुरुवार २ मे या कालावधीत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. असे फलक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधीकरणाने (एमएमआरडीए) डोंबिवलीतील रस्त्यांवर लावले आहेत.

या पूल बंदच्या विषयावर एमएमआरडीएचे अधीक्षक अभियंता अर्जुन कोरगावकर यांना संपर्क साधला, त्यांनी संपर्काला प्रतिसाद दिला नाही. मुंबई, ठाणे हे अंतर डोंबिवली परिसरातून कमी करणाऱ्या मोठागाव माणकोली उड्डाण पुलाचे काम गेल्या वर्षीच पूर्ण झाले आहे. या पुलाच्या भिवंडी बाजुकडील पूल ते मुंबई-नाशिक-आग्रा राष्ट्रीय महामार्गालगतच्या पोहच रस्त्याचे बहुतांशी काम पूर्ण झाले आहे. डोंबिवली बाजूकडील पुलाचा उतार ते रेतीबंदर रेल्वे फाटकापर्यंतच्या पोहच रस्त्याचे काम एमएमआरडीएकडून सुरू आहे. खाडीवरील पुलाचे काम पूर्ण झाल्याने आणि डोंबिवलीतील प्रवासी वाहनाने अर्धा तासात ठाणे तर एक तासात मुंबईला वाहतूक कोंडी मुक्त वातावरणातून पोहचत असल्याने प्रवासी माणकोली पुलाला आता पसंती देत आहेत.माणकोली पुलाच्या दोन्ही बाजुची कामे सुरू असल्याने आणि काही राजकीय मंडळींच्या हस्तक्षेपामुळे शासनाने या पुलाचे उदघाटन केले नसले तरी प्रवाशांच्या वाढत्या मागणामुळे पुलाचे उद्‍घाटन झाले नसले तरी प्राधिकरणाला पूल प्रवाशांसाठी खुला ठेवावा लागत आहे. सुरुवातीला प्राधिकरणाने पुलाची दोन्ही प्रवेशव्दारे अडथळे लावून बंद करण्याचे प्रयत्न केले. परंतु, प्रवाशांनी ते अडथळे दूर करून प्रवास सुरूच ठेवला, अनेकदा पुलाच्या सुरक्षा रक्षकला दमदाटी करून पुलाचे अडथळे बाजुला करण्यात आले आहेत. याठिकाणी कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न नको म्हणून अखेर प्राधिकरणाने पुलावरील वाहतूक सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला.या पुलावर काही धोका निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी एमएमआरडीए घेणार नाही या बचावासाठी प्राधिकरणाने पूल अधिकृतपणे सुरू झालेला नाही त्यामुळे पुलावरून वाहतूक करू नये, असेही फलक गेल्या वर्षीच या रस्त्यावर लावले आहेत.डोंबिवलीतून मुंबई, ठाणे, नाशिककडे जाणाऱ्या प्रवाशांना शिळफाटा रस्त्यावरील, दुर्गाडी भिवंडी कोन रस्त्यावरील कोंडीतून मुक्तता मिळत असल्याने प्रवासी माणकोली पुलाला अलीकडे सर्वाधिक पसंती देत आहेत. जड, अवजड वाहनेही या रस्त्यावरून आता धावू लागल्याने रेतीबंदर रेल्वे फाटकात, डोंबिवलीतील अंतर्गत रस्त्यांवर वाहन कोंडी होऊ लागली आहे.

या पुलावरील वाहन भार वाढू लागल्याने एमएमआरडीएने या पुलावरील वाहन भार तपासणीचे काम येत्या चार दिवसात करण्याचे नियोजन केले आहे. त्यामुळे सोमवार ते गुरुवारपर्यंत माणकोली उड्डाण पूल वाहतुकीसाठी बंद असणार आहे. प्रवाशांना हेलपाटा पडू नये म्हणून प्राधिकरणाने शनिवारी या रस्त्यावर पूल बंदचे फलक लावले आहेत. अनेक प्रवाशांना पूल बंदची माहिती मिळाली नाहीतर त्यांना पुलाजवळ जाऊन पुन्हा माघारी येऊन शिळफाटा किंवा पत्रीपूल मार्गे ठाणे, मुंबईत जावे लागणार आहे.

# महायुतीला बिनशर्त पाठिंबा देणाऱ्या राज ठाकरेंना धक्का

**ठाणे : निसर्ग चक्र टिम** - राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत आहे, ठाण्यात मनसेप्रमुख राज ठाकरे यांना मोठा धक्का बसला आहे. राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला आहे. मात्र दुसरीकडे शहापूरमधील मनसे कार्यकर्ते महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा प्रचार करताना दिसत आहेत. महाविकास आघाडीच्या प्रचार रॅलीमध्ये मनसेच्या कार्यकर्त्यांकडून जेसीबीनं फुलांची उधळण करण्यात आली आहे. त्यामुळे चर्चेला उधाण आलं आहे.

भिवंडी लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीकडून सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांना उमेदवारी देण्यात आली आहे. सुरेश म्हात्रे यांच्या प्रचार दौऱ्याची सुरुवात शहापूर तालुक्यातून करण्यात आली, यावेळी म्हात्रे यांची शहापूर शहरात एन्ट्री होताच मनसेचे कार्यकर्ते संतोष शिंदे यांच्यासह तब्बल 300 कार्यकर्त्यांनी म्हात्रे यांच्यावर जेसीबीमधून फुलांची उधळण करत त्यांचं जोरदार स्वागत केलं. आम्ही जरी मनसेचे कार्यकर्ते असलो तरी देखील आम्ही सुरेश म्हात्रे यांचे समर्थक आहोत. त्यामुळे आमचा पाठिंबा म्हात्रे यांनाच असणार आहे, असं कार्यकर्त्यांनी स्पष्ट केलं आहे, त्यामुळे चर्चेला उधाण आलं आहे.

दरम्यान दुसरीकडे मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी दिल्लीला जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. त्यानंतर मनसे देखील महायुतीमध्ये सहभागी होणार असल्याच्या चर्चेला उधाण आलं, अखेर गुढी पाडव्याच्या मेळाव्यात राज ठाकरे



यांनी आपली भूमिका जाहीर केली. महायुतीला बिनशर्त पाठिंबा देत असल्याचं त्यांनी म्हटलं. मात्र राज ठाकरे यांच्या या भूमिकेमुळे मनसेचे काही कार्यकर्ते नारज असल्याचं बोललं जात आहे.

# शासकीय यंत्रणांनी एकमेकांशी उत्तम समन्वय साधून लोकसभा निवडणूका शांततेत पार पडतील या दृष्टीने काम करावे - केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक

**ठाणे : निसर्ग चक्र टिम** - देशात लोकसभा निवडणुकांचे बिगुल वाजले असून शेवटच्या पाचव्या टप्यातील निवडणुका येत्या २० मे २०२४ रोजी होत आहेत. ठाणे जिल्ह्यातील २३-भिवंडी, २४-कल्याण, २५-ठाणे या लोकसभा मतदारसंघातील निवडणुका नि:पक्षपातीपणे, शांततेत व भारत निवडणूक आयोगाने आखून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आदर्श आचारसंहितेचे पालन करुन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील सर्व नोडल अधिकाऱ्यांनी गांभीर्याने काम करावे, सर्व शासकीय यंत्रणांनी आपापसात उत्तम समन्वय साधावा, असे निर्देश ठाण्यात दाखल झालेल्या केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षकांनी आज बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती सभागृह, नियोजन भवन येथे निवडणूक खर्चाच्या अनुषंगाने आढावा बैठक आयोजित केली होती. या बैठकीस २३ भिवंडी मतदारसंघाचे केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक चित्तरंजन मांझी, २४ कल्याण मतदारसंघाचे केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक नकुल अग्रवाल, २५ ठाणे लोकसभा मतदारसंघाचे केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक श्री. चंद्र प्रकाश मीना व श्री.राहील गुप्ता उपस्थित होते. तसेच पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) डॉ. धोंडोपंत स्वामी, निवडणूक निर्णय अधिकारी २३-भिवंडी संजय जाधव, २४-कल्याण सुषमा सातपुते, २५-ठाणे मनिषा जायभाये, नोडल अधिकारी कायदा व सुव्यवस्था दीपक क्षीरसागर, नोडल अधिकारी आदर्श आचारसंहिता विजयसिंह देशमुख तसेच आयकर विभाग, पोलीस विभाग- ठाणे नवी मुंबई, मिरा-भाईंदर, वसई विरार आयुक्तालय, केंद्रीय वस्तू व सेवाकर, महसूल, गुप्तचर संचालनालय, सीमा शुल्क व केंद्रीय उत्पादन शुल्क, अंमली पदार्थ नियंत्रक ब्युरो, अंमलबजावणी संचालनालय, राज्य उत्पादन शुल्क, वस्तू व सेवाकर, राज्य परिवहन विभाग, बँक ऑफ महाराष्ट्र, अग्रणी बँक ठाणे, खर्च संनियंत्रण समिती २३-भिवंडी, २४-कल्याण, २५-ठाणे आदी सर्व विभागांचे जिल्हा समन्वय अधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्व विभागांच्या जिल्हा समन्वय अधिकाऱ्यांकडून सद्य:स्थितीत सुरू असलेल्या कामांचा आढावा चारही निरीक्षकांनी घेतला. लोकसभा निवडणूक २०२४ या करिता निवडणूक आयोगाने राष्ट्रीयकृत बँका, को-ऑपरेटिव्ह बँका व खाजगी बँकांकडून होणाऱ्या मोठ्या व्यवहारांसाठी देण्यात आलेल्या क्यू-आर कोडच्या माध्यमातून झालेल्या आर्थिक व्यवहाराबाबत कशा प्रकारे कारवाई करण्यात आली याबाबतची माहिती घेतली. तसेच सी-व्हिजिल ॲपच्या माध्यमातून आलेल्या तक्रारींची माहिती घेवून कशा पध्दतीने कारवाई केली जात आहे, याबाबतही निरीक्षकांनी जाणून घेतले. तसेच मुंबईची जीवनवाहिनी ही लोकल सेवा असून ठाणे, कल्याण, उल्हासनगर या परिसरात अनेक रेल्वे स्टेशन्स आहेत या माध्यमातून देखील मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर कॅशची ने-आण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे नमूद करीत रेल्वे स्टेशनवर पोलीस विभागाच्या माध्यमातून आरपीएफची नेमणूक करण्याच्या सूचनाही त्यांनी या बैठकीत दिल्या. मतदानाचे शेवटचे चार दिवस हे अतिशय महत्वाचे असून या दिवसांत आरपीएफची कुमक वाढवावी, असेही त्यांनी नमूद केले.

१३७ भिवंडी, १४६ ओवळा, १५० ऐरोली हे विधानसभा मतदारसंघ संवेदनशील असून या ठिकाणच्या नोडल अधिकाऱ्यांना या ठिकाणी जास्त लक्ष केंद्रीत करुन कायदा व सुव्यवस्थेबाबत योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या. सर्व विभागांचे अधिकारी हे आपापले काम करीत असताना जर एखादी बाब आपल्या अखत्यारित नसेल पण जर त्या ठिकाणी काही आढळून आल्यास ते संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधून तातडीने कळविण्यात यावे.

आपण सर्वजण करीत असलेले निवडणुकीचे काम हे टीम वर्क आहे. त्यामुळे व्हॉटसअॅप ग्रुपच्या माध्यमातून एकमेकांशी संवाद साधत प्रत्येकांने काम करावयाचे आहे, असेही केंद्रीय खर्च निरीक्षकांनी यावेळी नमूद केले. बैठकीच्या सुरुवातीस जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी पुष्पगुच्छ देऊन सर्व खर्च निरीक्षकांचे स्वागत केले. प्रास्ताविक खर्च नियंत्रण समितीचे नोडल अधिकारी सत्यवान उबाळे यांनी केले. सूत्रसंचलन मुख्य वित्त व लेखा अधिकारी वैजनाथ बुरडकर यांनी केले.

बैठकीच्या शेवटी एकत्रित मीडिया कक्ष व माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण नोडल अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांनी उपस्थित केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक आणि उपस्थित नोडल अधिकाऱ्यांचे आभार मानले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शिवम राजेंद्र वखरे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया,अॅण्ड पब्लिकेशन प्रा.लि.डब्ल्यू ,२३०, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया खैरणे,एम.आय. डी.सी., ठाणे - बेलापूर रोड ,नवी मुंबई,जि.ठाणे , पिन कोड.नं.४००७१०, येथे छापून फ्लॅट नं. २१९, पहिला मजला, एल.आय.जी. बिल्डींग नं. १६, बिर्ला कॉलेज समोर, चिकणघर, कोकण वसाहत, कल्याण (प.), ता. कल्याण , जि. ठाणे , पिन कोड.नं.४२१३०१ येथून प्रकाशित केले.(आर.एन.आय.नं. एम ए एच एम ए आर / २०२२/८३३३८ ) , **Mob. 09987496136**

Printed , Published , Owned & Editor : Shivam Rajendra Vakhare, Printed at SIDDHAKALA PRINT MEDIA & PUBLICATIONS PVT. LTD. , PLOT. No. W-230 , TTC Industrial Area , Khairne MIDC, Navi Mumbai- Dist. Thane.MAHARAHTRA- 400710 Published From - Flat no 219, First Floor, L.I.G. Blg No 16, Opp- Birla College Chikanghar, Kokan Vasahat, Kalyan (w), Taluka - Kalyan, Dist- Thane. Pin Code- 421301- (Maharashtra) **RNI.No. MAHMAR/2022/83338**